

आंतरविभागीय ट्रॅक स्पर्धेचे उद्घाटन करताना मान्यवर.

# आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धा

राजगुरुनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. ८) आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धेचे आयोजन शिवछत्रपती क्रीडासंकुल बालेवाडी येथे करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र मानवाधिकार महिला सेलच्या कार्यकारी अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. दीपक माने, क्रीडा मंडळ प्रतिनिधी शिवाजी उत्तेकर, महाराष्ट्र राज्य सायकलिंग प्रशिक्षक दीपाली निकम, शिवछत्रपती पुरस्कारविजेते संजय सातपुते, दीपाली शिलदनकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर आणि नाशिक अशा चारही विभागांतून आलेल्या सायकलिंग खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतून निवडला जाणारा संघ हा जानेवारी २०२३ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी परिश्रम घेतले.